संक्षिप्त वृत्त

राष्ट्रीय मार्शल आर्ट स्पर्धेत शार्दूल जगदाळेला रौप्यपदक

सोलापूर : कोल्हापुरात झालेल्या सहाव्या राष्ट्रीय स्कील-डो-मार्शल आर्ट कराटे स्पर्धेत सोलापूरच्या शार्दूल जगदीश जगदाळे याने रौप्यपदक प्राप्त केले. या स्पर्धेत द ड्रॅगन तायक्वांदो अकॅडमी, वसंत विहार येथील शार्दूलने रौप्य पदक मिळविले. त्याला बौद्धराज ढेपे, संभाजी मस्के, डॉ. सृष्टी ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धांमध्ये आर्यन वाकसेचे यश

सोलापूर : नुकत्याच उदगीर, लातूर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धामध्ये सोलापूर नवी पेठेतील भगवा आखाडा तालमीतील पैलवान आणि सदस्य अमोल वाकसे यांचे चिरंजीव पैलवान आर्यन वाकसेने १४ वर्षाखालील ४१ किलो वजनी गटांमध्ये कांस्यपदक मिळवले. आर्यन हा पुणे येथील अंतरराष्ट्रीय कुस्ती केंद्रात सराव करीत आहे. त्याला शिवछत्रपती पुरस्कार विजेते पैलवान गोविंद पवार, आंतरराष्ट्रीय खेळाडू पैलवान अमोद काशीद यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

अनिल चोरमले यांचा सत्कार

सोलापूर : पुणे विभागीय क्रीडा संचनालयाचे क्रीडा उपसंचालक अनिल चोरमुले यांचा सांगोला येथे सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आला. चोरमले यांनी सांगोला येथे विभागीय कबड्डी स्पर्धेदरम्यान निवड समिती सदस्य आणि पंचप्रमुख म्हणून कार्य केल्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला.

अण्णप्पा काडादी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

सोलापूरः के.एल.ई.बेळगावी संचलित अण्णप्पा काडादी हायस्कूलमधील सन १९९६ मधील माजी विद्यार्थ्यांचा दिवाळी मनातली शाळा- एक दिवाळी फराळ शाळेसोबत अंतर्गत सर्व माजी शिक्षक- माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित केला होता. यावेळी मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले.यावेळी दया, जाधव, संजय, बगले, अमित गुंड, सचिन भिंगारे, माजी शिक्षक चांदोडे, लकशेट्टी, म्हमाणे, डी. एल. पाटील आदी उपस्थित होते.

राहुल होनकळस यांना विद्यापीठाकडून सीड मनी मंजूर

सोलापूर : बी. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील प्रा.राहुल राजन होनकळस यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून संशोधनास अर्थसाहाय्य म्हणून सीडमनी मंजूर करण्यात आले. या योजनेंतर्गत विद्यापीठाकडून प्रस्ताव मागविले होते. राहुल राजन होनकळस यांना ७४ हजार रुपये संशोधन निधी मिळणार आहे. प्रा. होनकळस यांनी मेकॅनिकल विषयाशी निगडित परफॉर्मन्स ॲनॅलिसीस ऑफ स्मॉल स्केल कंपोझीट टनेल सोलार ड्रायर या विषयावर प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास विद्यापीठाने मान्यता दिली असून, संशोधनासाठी अनुदान मिळणार आहे. त्यांचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उप-प्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, डॉ. एस. एम. जगदे यांनी अभिनंदन केले.

सांगोल्यात ४१ कुणबी नोंदी आढळल्या

सुराज्य/सांगोला

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सांगोला तालुक्यातील नऊ गावांतील मोडीतील ८ लाख ७३ हजार १०३ पानांच्या केलेल्या तपासणी नोंदीदरम्यान जन्म-मृत्यू नोंद वहीतून तपासलेल्या दोन लाख ९३ हजार ५४२ नोंदीतून ४१ कुणबी नोंदी सापडले आहेत. यापैकी चार नोंदी मराठी भाषेतून तर ३७ नोंदी मोडी लिपीतून मिळाल्याची माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली.

मराठा आरक्षण

मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात सांगोला तहसील कार्यालयातील अभिलेखामध्ये दि. ६ नोव्हेंबरपासून नायब तहसीलदार, लिपिक, मंडल अधिकारी, तलाठी, कोतवाल यांच्यामार्फत १० महसूल मंडलातील सन १९६७ पूर्वीचे मोडीतील विविध प्रकारच्या नोंदी, दस्तऐवज कागदपत्राची तपासणी सुरु आहे. आत्तापर्यंत दि. १७ नोव्हेंबर अखेरपर्यंत तालुक्यातील ९ गावांतून एखतपूर, पाचेगाव ब्रु. चिकमहद, मेथवडे, राजापूर, वाढेगाव, चोपडी, वाटंबरे, संगेवाडी या गावातील ३७ हजार २८ कागदपत्रांची तपासणी केली असता यामध्ये ४१ कुणबी नोंदी सापडल्या आहेत. चिकमहूद गावातील २ हजार ५२१ कागदपत्रातून मराठी भाषेतील एक तर मोडी लिपीतून चार अशा एकूण पाच नोंदी सापडल्या आहेत. मेथवडे गावातून ३ हजार ९०० कागदपत्र तपासणीतून मराठी भाषेतील एक तर मोडी लिपीतील पाच अशा एकूण सहा नोंदी सापडल्या आहेत. एखतपूर गावांमध्ये ३ हजार ३४२ कागदपत्रे तपासणीतून मराठी भाषेतील दोन तर मोडी लिपीतील तीन अशा एकूण पाच कुणबी नोंदी सापडल्या आहेत. पाचेगाव ब्रु. गावातील २ हजार ७३३ कागदपत्र तपासणीतून सर्वाधिक मोडी भाषेतील नऊ नोंदी सापडल्या आहेत. वाढेगावमध्ये ४ हजार ६१८ कागदपत्रांपैकी मोडी भाषेतील एक नोंद सापडली आहे. राजापूरमध्ये १ हजार ८०५ कागदपत्रे तपासणीतून मोडी भाषेतील एक नोंद सापडली आहे. चोपडी गावात ५ हजार १३९ कागदपत्रे तपासणीतून मोडी भाषेतील एक नोंद सापडली आहे. वाटंबरेमध्ये ६ हजार १४ कागदपत्रांमधून मोडी भाषेतील सहा नोंदी सापडल्या आहेत. संगेवाडी गावातून ६ हजार ९५६ कागदरते तपासणीतून मोडी भाषेतील सात नोंदी आढळत आल्या आहेत. सन १९४८ ते १९६७ व १९४८ पूर्वी अशा दोन टप्प्यांमधून कुणबी कागदपत्रांच्या नोंदी सध्या तपासल्या जात आहेत. तालुक्यात सापडलेल्या ४१ नोंदी या सन १९३९ पूर्वीच्या कागदपत्रातून मिळाल्या आहेत.

काम युद्धपातळीवर

या अभिलेख तपासणी मोहिमेत नायब तहसीलदार, २ लिपिक, १० मंडल अधिकारी, ४२ तलाठी व १० कोतवाल असे ६५ अधिकारी कर्मचारी मिळून या दस्तऐवजाची तपासणी करून पुरावे शोधले जात आहेत. अजूनही मराठी, उर्दू, फारसी, कन्नड आणि मोडी भाषेतून कुणबी पुरावे शोधण्याचे कामकाज सुरू आहे.

- संतोष कणसे,
तहसीलदार, सांगोला

पंढरपुरातील ६५ एकरात लाखांवर भाविक दाखल

सुराज्य/सोलापूर

- प्रशासन सज्ज
- ४९७ प्लॉटपैकी २७८ चे वाटप, १०६ दिंड्या दाखल
- प्रांताधिकारी गजानन गुरव यांची माहिती

कार्तिकी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा गुरुवार, दि. २३ रोजी साजरा होत आहे. एक दिवसावर सोहळा येऊन ठेपला आहे. त्यामुळे संताचे लहान मोठे पालखी सोहळे पंढरपूर नजीक दाखल झाले आहेत. ६५ एकर येथेही लाखांवर भाविक दाखल झाले आहेत. ४९७ पैकी २७८ प्लॉटचे बुकींग देखील पूर्ण झाले आहे. भाविक राहुट्या, तंबू, मंडप उभारुन वास्तव्य करु लागले आहेत. ६५ एकरात भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिली.

कार्तिकी यात्रेसाठी चंद्रभागात नदीवाळवंटात उभारण्यात येत असलेल्या राहुटयांना चंद्रभागा नदीपलीकडील ६५ एकरात दिंड्यांना राहण्यासाठी प्रशासनाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. येथील सर्व ४९७ प्लॉटचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार, दि. २१ रोजी दुपारी २७८ प्लॉटचे वाटप केले असून, १०६ दिंड्या दाखल झाल्या आहेत. एक लाख ९० हजार १० भाविक दाखल झाले आहेत. सद्या तंबू, राहुट्या उभारून भाविक येथे वास्तव्य करत आहेत. भजन, कीर्तन व प्रवचनात भाविक दंग झाले असल्याने भक्ती सागर विठ्ठल भक्तीत दंग झाल्याचे चित्र दिसून येते.

धनगर एसटी आरक्षणाची तत्काळ अंमलबजावणी करा

सुराज्य/सोलापूर

धनगर समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

धनगर समाज एसटी आरक्षणाची तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना आ. गोपीचंद पडळकर यांच्या आव्हानानुसार सकल धनगर समाजाच्यावतीने निवेदन देण्यात आले.

आरक्षणाचा पहिला टप्पा असून, पुढील काळात शासनाला जाग आणण्यासाठी उग्र आंदोलन होईल. आमदार पडळकर यांच्या नेतृत्त्वाखाली राज्यातील सर्व धनगर समाज बांधवांनी मंगळवारी राज्यातील सर्व तहसीलदार, प्रांत अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आपला प्रश्न शासन दरबारी पोहोचवणे आणि आपल्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारने तातडीने धनगर आरक्षणाचे अंमलबजावणी करावी, अन्यथा येणाऱ्या निवडणुकींमध्ये भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती सरकारला गंभीर परिणामास सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला.

...तर नागपूरला विधानभवनाला घेराव घालणार

धनगर समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधीच एसटीचे आरक्षण दिले आहे. त्याची फक्त अंमलबजावणी होणे बाकी आहे. सरकार सोबतच्या बैठकीनंतर ६० दिवस पूर्ण होऊनही काही कारवाई झाली नाही. महाराष्ट्रातील सगळ्या तहसीलदारांना निवेदने दिली आहेत. या काळात सरकारने अंमलबजावणी केली तर ठिक अन्यथा नागपूर येथे डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या अधिवेशन काळात दि. ११ डिसेंबरला महाराष्ट्रातल्या धनगरांचा विधानभवन घेरण्यासाठी भव्य मोर्चा आयोजित केला आहे. यासाठी राज्यभरातील समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे, असे आ.गोपीचंद पडळकर यांनी कळविले आहे.

मतदार पुनर्रिक्षण शिबिराचे आयोजन

सोलापूर : मतदार संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील २४८ - शहर उत्तर व २४९ - सोलापूर शहर मध्य मतदार संघातील सर्व मतदान केंद्रावर दि. २५ व २६ नोव्हेंबरदरम्यान विशेष शिबिराचे आयोजन केले आहे. मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तहसीलदार यांनी केले आहे.

कुर्बान हुसेन नगरात चाकूने मारहाण

सुराज्य/सोलापूर

पराजवळ गोंधळ करू नका, असे सांगितल्याच्या कारणावरून एका तरुणाला चाकू आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना शास्त्रीनगर परिसरातील कुर्बानहुसेन नगरात सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. आयूब याकूब शेख (वय-२४, कुर्बान हुसेननगर) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी कयूम (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पराजवळ काही मुले पळापळी करीत होते. त्यावेळी शेख यांनी येथे गोंधळ करू नका असे सांगितले. तेंव्हा चिडून शाहरुख पठाण आणि अन्य दोघांनी मिळून त्यांना मारहाण केली. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली.

भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना

सुराज्य/पंढरपूर

कार्तिक यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिली.

कार्तिक वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय येऊ नये यासाठी पत्राशेड, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट,, नगरपालिका या पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे मुख्य नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्षात नेमणूक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश प्रांताधिकारी गुरव यांनी दिले.

कार्तिकी शुध्द एकादशी गुरूवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी असून, यात्रा कालावधी दि.१४ ते २७ नोव्हेंबर असा राहणार आहे. या कालावधीत यात्रा सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ होऊ नये यासाठी ५ पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे मुख्य नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. मुख्य नियंत्रण कक्ष दि. १७ ते २७ नोव्हेंबर २०२३ या वारी कालावधीत २४ तास सुरु राहणार आहे.

सोलापूर : काँग्रेस बूथ यंत्रणा नियोजन बैठकीप्रसंगी पदाधिकारी-कार्यकर्ते.

शहर उत्तरमधून काँग्रेसला लीड देणार

उदय चाकोते यांचा विश्वास : बूथ यंत्रणा नियोजन बैठक

सुराज्य/सोलापूर

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून लोकसभेसाठी काँग्रेसला जास्तीत जास्त मताधिक्य देण्याचे आवाहन ई ब्लॉक काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष उदय चाकोते यांनी केले.

शहर ई ब्लॉक काँग्रेस कमिटीच्यावतीने शहर उत्तरमधील भवानी पेठेतील श्री रेवणसिद्धेश्वर मंगल कार्यालयात लोकसभा निवडणूक पूर्वतयारी बूथ यंत्रणा नियोजन बैठकीचे आयोजन केंद्रीय माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि आमदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते उपस्थित होते. यावेळी चेतन नरोटे म्हणाले, शहर उत्तरमध्ये काँग्रेसची बुथ यंत्रणा मजबूत करून काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करावे. प्रास्ताविकात ई ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते यांनी सोलापूर शहर उत्तरमधून काँग्रेसला जास्तीत जास्त लीड मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी सिध्दाराम चाकोते, अशोक निंबर्गी, ई ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, केदारनाथ उंबरजे, प्रमिला तुपलवंडे, विनोद भोसले, सुनील रसाळे, दत्तू अण्णा बंदपट्टे, अशोक कलशेट्टी, एन.के. क्षीरसागर, विवेक कन्ना, भारती ईप्पलपल्ली, प्रवीण जाधव, पशुपती माशाळ, संयमित्रा चौधरी, विणा देवकते, सुशील बंदपट्टे महेश लोंढे, राहुल वर्धा, राजेंद्र शिरकूल, मल्लिनाथ सोलापुरे उपस्थित होते. यासाठी चंद्रकांत टिके, विकी चाकोते, सुनील सारंगी, अभिषेक वाले, आदित्य म्हमाणे, नागनाथ भोसले, संजय गायकवाड, बापू शिंदे, आनंद खटके, पप्पू कलशेट्टी, नूरअहमद नालवार, रुपनर, श्रीकांत दासरी, लिंगराज ताटिकोंडा, बसवराज जाबा, सुमीत सुरवसे, प्रतीक लिगाडे, श्रीनिवास कोटा यांनी परिश्रम घेतले.

हत्तुरे नगरात अखंड हरिनाम सप्ताह

सिद्रामप्पा हत्तुरे यांच्या १८ व्या पुण्यस्मरणानिमित्त सप्ताहाचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

लिंगैक्य श्री सिद्रामप्पा मल्लप्पा हत्तुरे यांच्या १८ व्या पुण्यस्मरणानिमित्त हत्तुरे नगर येथे रविवारपासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला. लिंगैक्य श्री सिद्रामप्पा मल्लप्पा हत्तुरे यांच्या १८ व्या पुण्यस्मरणानिमित्त प्रतिवर्षी हत्तुरे परिवार आणि हत्तुरे नगरवासियांच्यावतीने श्रीशैल हत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा आयोजित केला जातो.

यावेळी ह.भ.प. सोहम महाराज, श्री दत्तात्रय महाराज भोसले यांचे कीर्तन झाले. संत पूजन महेश हत्तुरे यांच्या हस्ते झाले. या कीर्तनामध्ये मृदंग साथ ज्योतिराम चांगभले, मारुती क्षीरसागर, गायन साथ मनोज कासार, काशिनाथ सुरवसे यांची साथ लाभली.

यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष संजय पवार, ह.भ.प.निवृत्ती महाराज ताकमोगे, सुरेश कामशेट्टी, शशिकांत वसंतपुरे, खंडेराव कडबाने, सुचिन कोटाणे, भिमाशंकर हत्तुरे, प्रकाश कुंभार, निंगय्या स्वामी, प्रतीक विजापुरे, गौरव अथने, सुरेश वदाले, प्रज्ज्वल विजापुरे, संतोष पाटील, शशिकांत ख्याड, सिध्दाराम वाले, राजू हुडे आदी उपस्थित होते.

या सोहळ्यास अखिल भाविक वारकरी मंडळासह कोंडी येथील भजनी मंडळ, कुमठे येथील भजनी मंडळ, मजरेवाडी भजनी मंडळ, भारत मातानगर भजनी मंडळसह हत्तुरे नगर परिसरातील विविध सामाजिक संस्था- संघटना, गणेशोत्सव मंडळाचे सहकार्य लाभले. अखंड हरिनाम सप्ताहाचा अधिकाधिक भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन हत्तुरे परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

आ.समाधान आवताडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

शिबिरात ७४७ जणांचे रक्तदान

सुराज्य/मंगळवेढा



पंढरपूर, मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांचा ४७ वा वाढदिवस विविध समाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

आमदार जनसंपर्क कार्यालय, मंगळवेढा येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ७४७ जणांनी रक्तदान केले. सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची नोंदणी व गावोगावी पशु आरोग्य तपासणी शिबीर आदी उपक्रम पार पडले. यावेळी श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे यांच्या हस्ते स्व. महादेवराव आवताडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याची काही जोडप्यांनी नोंदी करून या विवाह सोहळ्यात आपला विवाह करण्याचे निश्चित केले. मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येक गावोगावी पशुवैद्यकीय विभागामार्फत पशु आरोग्य तपासणी शिबीर येऊन अनेक पशुधनांची तपासणी आणि औषधोपचार केले.

यावेळी नवनाथ पवार, सोमनाथ आवताडे, प्रदीप खांडेकर, धनंजय पाटील, दत्तात्रय जमदाडे, अंबादास कुलकर्णी, प्रदीप खांडेकर, शशिकांत चव्हाण, संतोष मोगले, सुरेश भाकरे, सचिन शिवशरण, चंद्रकांत पडवळे, राजेंद्र सुरवसे, संचालक तानाजी काकडे, जगन्नाथ रेवे, कैलास कोळी, दादासाहेब ओमणे, दादा दोलतोडे, भारत निकम, विजय माने, भारत आटकळे, दिगंबर यादव, श्याम पवार, मोहन पिसे, सिध्देश्वर दत्तू, युवराज शिंदे, राजकुमार यादव, सुधाकर मासाळ, विनायक यादव, सतीश पवार, शिवाजी पटाप, सुदर्शन यादव, जनार्धन कोंडुभैरी, सुरेश मेटकरी, समाधान हेंबाडे, साहेबराव उगाडे, दत्ता साबणे उपस्थित होते. रक्त संकलनासाठी सिव्हील हॉस्पिटल येथील रक्तपेढीच्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.